**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
UGC Approved Sr.No.64259
Vol - V | Issue-II | FEBRUARY | 2018 | ISSN 2349-638x | Impact Factor 4.574

# गडचिरोली जिल्हयातील लोकसंख्येचे वितरण – एक भौगोलिक अभ्यास

**प्रा.डॉ. प्रशांत व्हि. बुराडे**
भूगोल विभागप्रमुख
डॉ.अरुण मोटघरे महाविद्यालय,
कोंढा–कोसरा, ता.पवनी,जि.भंडारा

**सारांश:**

गडचिरोली हा जिल्हा महाराष्ट्राच्या अती पूर्वेला आहे. हा जिल्हा नक्षलग्रस्त व मागासलेला आहे. हा जिल्हा नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण आहे. या जिल्हयात मोठया प्रमाणात बहूमुल्य नैसर्गिक वनसंपत्ती तसेच मोठया प्रमाणात खनिज संपत्ती, नदया आहेत. या सर्व घटकांचा लोकसंख्येचा वितरणावर मोठा प्रभाव पडतो त्यामुळे गडचिरोली जिल्हयातील लोकसंख्या, लोकसंख्येचे वितरण व या वितरणावर परिणाम करणारे घटक कोणते याचा अभ्यास या लघुशोध प्रबंधात करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना:**

निसर्गाने निर्माण केलेल्या अदभूत घटकांमध्ये मानव हा घटक सुध्दा समाविष्ट आहे. मानवाने आपल्या बौध्दिक क्षमतेचा सहाय्याने व स्वत:च्या कार्यकर्तृत्वाने इतर निसर्गनिर्मीत घटकांमध्ये स्वत:चे वेगळे असे स्थान निर्माण केलेले आहे. मानवाच्या लाखोवर्षाच्या प्रयत्नातून त्याची स्वत:ची संस्कृती विकसीत झालेली आहे. मानव इतर सजीव व निर्जीव घटकांबरोबर स्वत: संसाधन बनलेला आहे. सर्व सजीव संसाधनामध्ये मानव हा अतिशय महत्वाचा संसाधन आहे. ज्या प्रदेशातील किंवा देशातील मानव मानसीक, शैक्षणिक व बौध्दिक दृष्टया विकसीत असतात तो प्रदेश किंवा देश विकसीत असतो. परंतु ज्या प्रदेशातील किंवा देशातील मानव मानसिक, शैक्षणिक व बौध्दिकदृष्टया अविकसीत असतात तो देश अविकसीत असतो. त्यामुळेच जगातील काही देश विकसीत आहेत. तर काही देश अविकसीत आहेत देशाच्या विकासावर त्या देशातील लोकसंख्येचा फार मोठा परिणाम होत असतो. आर्थिक विकासाकरीता नैसर्गिक संसाधने आवश्यक असतात पण त्या संसाधनाचा विकास घडवून आणण्यासाठी मानवी प्रयत्न आवश्यक असतात. मानव हा मानवी विकासप्रक्रियेतील महत्वाचा घटक आहे तसेच तो संसाधन विकासाचा केंद्र बिंदू आहे.

भारताच्या विकासामध्येसुध्दा भारतातील लोकसंख्या हा घटक महत्वाची भूमिका बजावित आहे. भारतामधील उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा वापर भारतातील लोकसंख्या मोठया प्रमाणात करीत आहे. त्यामुळे भारत हा देश जलदगतीने विकासाकडे वाटचाल करीत आहे. परंतु भारतातील प्रत्येक प्रदेशाचा सारख्याच प्रमाणात विकास झालेला नाही. भारतातील काही प्रदेश विकसीत आहेत तर काही प्रदेश अविकसीत आहेत. त्यामुळे विकसीत प्रदेशात लोकसंख्येची घनता जास्त आढळून येते तसेच भारतात लोकसंख्येचे वितरण असमान झालेले पहावयास मिळाले.

**उद्देश :**

गडचिरोली जिल्हयातील लोकसंख्येच्या वितरणाचा अभ्यास करणे.

**अभ्यास पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा पूर्णत: व्दितीयक माहितीवर आधारीत आहे. जनगणना पस्तिका, आर्थिक व सामाजिक समालोचन, चांदा जिल्हा गॅझीटीयर, विविध शासकिय कार्यालय यांच्याकडे उपलब्ध असलेली आकडेवारी संकलीत करण्यात येवून त्या आकडेवारीचे नकाशाशास्त्रीय पध्दतीने विश्लेषण करण्यात आले. प्रस्तुत शोधनिबंधात गडचिरोली जिल्हयातील लोकसंख्या, तिचे वितरण व घनता इ. बाबी अभ्यासण्यात आल्या आहेत.

**अभ्यासक्षेत्र :**

गडचिरोली हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या अतिपूर्वीला आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीनंतर २६ ऑगष्ट १९८२ ला विशाल अशा चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन करून या नविन जिल्हयाची निर्मीती करण्यात आली. उत्तर—दक्षिण दिशेने वाहणाऱ्या वैनगंगा नदिव्दारे चंद्रपूर जिल्हयाचे दोन जिल्हयात विभाजन करण्यात आले. वैनगंगा नदि पात्राच्या पुर्वेला गडचिरोली व पश्चिमेला चंद्रपूर जिल्हा अस्तीत्वात आलेला आहे.

या जिल्हयाचे अक्षवृत्तीय स्थान १८°४१’ उत्तर ते २०°५०’ उत्तर आहे तर रेखावृत्तीय स्थान ७९°४६’ पूर्व ते ८०°५५’ पूर्व आहे. या जिल्हयाचा क्षेत्रफळ १४४१२ चौ.कि.मी. आहे.

भूपृष्ठ स्वरूपाच्या बाबतीत या जिल्हयात मोठया प्रमाणात विविधता आढळून येते. या जिल्हयाचा उत्तर व पूर्व भाग डोंगराळ असुन जंगलव्याप्त आहे. या जिल्हयात अनेक लहान—मोठया नदया आहेत.

**गडचिरोली जिल्हयाची लोकसंख्या :**

गडचिरोली जिल्हयाची निर्मीती २६ ऑगष्ट १९८२ ला चंद्रपूर जिल्हयाची विभागणी होवून झाली. १९९१ मध्ये गडचिरोली जिल्हयाची लोकसंख्या ७८७०१० होती. ती २३.२९% नी वाढून २००१ मध्ये ९७०२९४ झाली. पुढे ती लोकसंख्या २०११ मध्ये १०.५८% नी वाढून १०७२९४२ झाली. सन २०११ मध्ये १०७२९४२ लोकसंख्यामध्ये ५४१३२८ पुरूष लोकसंख्या ४९११०१ स्त्री लोकसंख्या होती. एकूण लोकसंख्येत ११८०३३ शहरी लोकसंख्या व ९५४९०१ ग्रामीण लोकसंख्या आहे. सन २०११ मध्ये एकूण लोकसंख्येत १२०७४५ अनुसुचित जाती लोकसंख्या व ४१५३०६ अनुसुचित जमातीची लोकसंख्या पाहवयास मिळते. १२०७४५ अनुसुचित जाती लोकसंख्यापैकी ६१०४१ (४९.४१%) पुरूष व ५९७०४ (५०.६%) स्त्री लोकसंख्या आहे तर ४१५३०६ अनुसुचित जमातीची लोकसंख्सापैकी २०७३७७ (४९.९%) पुरूष व २०७९२९ (५०.१%) स्त्रीचा आढळून येतात. भारतात सर्वत्र स्त्रीयांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेने कमी असतांना गडचिरोली सारख्या मागास जिल्हयातील आदिवासींमध्ये पुरूषांच्या तुलनेने स्त्रीयांचे प्रमाण अधिक पाहवयास मिळते. या जिल्हयात आदिवासी पुरूषांच्या तुलनेने स्त्रीयांचे प्रमाण अधिक असणे हे या जिल्हयाचे एक वैशिष्टये आहे.

गडचिरोली जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येत ८६.४४% हिंदू, १.९६% मुस्लीम, ०.३६% ख्रिश्चन, ०.१% शिख व ७.७% लोकसंख्या बौध्द धर्माचे आहेत.

**गडचिरोली जिल्हयातील लोकसंख्येचे वितरण :**

गडचिरोली जिल्हयाच्या लोकसंख्येच्या वितरणाच्या अभ्यासात गडचिरोली जिल्हयातील लोकसंख्येची घनता, लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक व लोकसंख्येचे तालुकानिहाय वितरण यांचा अभ्यास महत्वाचा आहे.

**गडचिरोली जिल्हयातील लोकसंख्येची घनता :**

गडचिरोली जिल्हयात लोकसंख्येच्या घनतेमध्ये असमानता पाहावयास मिळते. गडचिरोली जिल्हयाची घनता ७४.४५ आहे; तर जिल्हयात देसाईगंज तालूक्यात सगळयात जास्त लोकसंख्येची घनता आढळून येते. देसाईगंज तालुक्याची २३३.२४ लोकसंख्येची घनता आढळून येत आहे. आरमोरी तालुक्याची घनता १३५.४२, चामोर्शी तालुक्याची घनता १३६.३०, गडचिरोली तालूक्याची घनता १०५.७९ व कुरखेडा तालूक्याची घनता १०० पेक्षा कमी आहे. सगळयात कमी घनता भामरागड तालुक्याची आहे. भामरागड तालुक्याची लोकसंख्येची घनता २५.५८ इतकी आहे.

**सारणी**

| तहसिल | वर्ष २००१ | वर्ष २०११ | क्षेत्र | घनता |
|---|---|---|---|---|
| अहेरी | १०३७५९ | ११६९९२ | २२८२.७० | ५१.२ |
| आरमोरी | ९०८४६ | ९७०९७ | ७१७.९० | १३५.४२ |
| भामरागड | ३१६७९ | ३६३२५ | १४२०.५८ | २५.५८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चमोर्शी | १६५५१४ | १७९१२० | १३१४.१८ | १३६.३० |
| देसाईगंज | ७६१५४ | ५४८२६ | २३५.०६ | २३३.२४ |
| धानोरा | ७७३४६ | ८२६८९ | १७३६.९२ | ४७.६१ |
| एटापल्ली | ७०६२७ | ८१७१३ | २२६७.३० | ३६.०४ |
| गडचिरोली | १२६३१३ | ९१८११ | ८६७.८६ | १०५.७९ |
| कोरची | ४०७३६ | ४२८११ | ६८०.४४ | ६२.९२ |
| कुरखेडा | ७७९३६ | ८६०७३ | ८३९.६८ | १०२.५१ |
| मूलचेरा | ३९६११ | ४५७८७ | ७३५.८१ | ६२.२.५ |
| सिरोंचा | ६९७७३ | ७४७५६ | १२५६.६० | ५९.४९ |
| | | १०७२९४२ | १४४१२.००चौ. किमी. | |

**गडचिरोली जिल्हयाची लोकसंख्या**

| वर्ष | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| लोकसंख्या | ७८७०१ | ९७०२९४ | १०७२९४२ |

**गडचिरोली जिल्हयातील लोकसंख्येची वितरणावर परिणाम करणारे घटक :**

१) **भूपृष्ठ रचना :**

जिल्हयात उत्तर आणि मध्यभागात पूर्वेकडे प्रामुख्याने टेकडयांचा प्रदेश आहे. तसेच जिल्हयाच्या पूर्वभागत उत्तर–दक्षिण दिशेत अनेक टेकडया दिसतात. त्यामुळे या भागात लोकसंख्या विरळ आढळते. जिल्हयाच्या पश्चिमेला व दक्षिणेला मैदानी मंद उताराचा प्रदेश आहे. त्यामुळे येथे लोकसंख्येची घनता अधिक आढळते.

२) **नैसर्गिक वनस्पती :**

गडचिरोली जिल्हा हा जंगलव्याप्त आहे. जेथे घनदाट जंगलाचे प्रमाण कमी, लोकसंख्येची घनता कमी तर जेथे, घनदाट जंगलाचे प्रमाण जास्त आहे तेथे लोकसंख्येची घनता जास्त पाहवयास मिळते. देसाईगंज, आरमोरी, गडचिरोली व चामोर्शी या तालुक्यामध्ये घनदाट जंगलाचे प्रमाण इतर तालुक्याच्या तुलनेने कमी आहे त्यामुळे या तालुक्यामध्ये लोकसंख्याची घनता जास्त आढळून येते.

३) **नदीप्रणाली :**

संपूर्ण जिल्हयावर वैनगंगा नदीचा मोठा प्रभाव पडलेला पाहवयास मिळते. ही नदी जिल्हयाच्या वायव्य सिमेवरून जिल्हयात प्रवेश करते व दक्षिणेकडे जावून नैऋत्यसिमेवर गोदावरी नदीला मिळते. या नदीने पुर्व किनारी प्रदेशात सुपीक असा मैदानी प्रदेश निर्माण केलेला आहे. त्यामुळे या किनारी प्रदेशात लोकसंख्येची घनता जास्त पाहवयास मिळते. तर या नदीप्रदेशाच्या अति पूर्वकडे या नदीचा फारसा प्रभाव नसल्यामुळे येथे लोकसंख्येची घनता विरळ आढळून येते.

४) **मृदा :**

गडचिरोली जिल्हयातील वैनगंगा व गोदावरी नदिच्या किनारी प्रदेशात जुनी गाळाची मृदा आढळते. या प्रदेशात कृषी व्यवसाय विरजीत झालेला आहे. त्यामुळे या प्रदेशात लोकसंख्या दाट पाहवयास मिळते तर जिल्हयाच्या इतर भागात लाल वाळूयुक्त (Red Sandy) मृदा आढळते. या लाल वाळूयुक्त प्रदेशात लोकसंख्या विरळ आढळून येते.

५) **औद्योगिक विकास :**

गडचिरोली जिल्हा हा औद्योगिकदृष्टया मागासलेला जिल्हा आहे. परंतु या जिल्हयाच्या पश्चिम किनाऱ्यावरून वाहणाऱ्या वैनगंगा नदीच्या प्रदेशात कृषी व्यवसाय विकसीत झाल्यामुळे पश्चिम किनाऱ्यावरील भागात कृषीवर आधारीत उद्योगांचा थोडाफार प्रमाणात विकास झालेला आहे. त्यामुळे या भागात लोकसंख्या जास्त व इतर प्रदेशात कमी आढळते.

६) **कृषी विकास :**

गडचिरोली जिल्हयात वैनगंगा ही मुख्य नदी आहे. त्या नदीने जिल्हयाचा पश्चिम भाग उत्तर–दक्षिण दिशेत व्यापलेला आहे. या नदीने येथे मोठया प्रमाणात सुपीक प्रदेश निर्माण केलेला आहे तसेच येथे जलसिंचनाच्या साधनांचा मोठा प्रमाणात विकास झालेला आहे. या कारणाने येथे कृषी व्यवसाय विकसीत झालेला आहे व इतर प्रदेशात कृषी व्यवसाय विकसीत कमी झालेला आहे. म्हणून वैनगंगा नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेशात जास्त लोकसंख्या व इतर प्रदेशात विरळ लोकसंख्या पहावयास मिळते.

७) **वाहतुकीच्या साधनांचा विकास :**

गडचिरोली जिल्हयातील गडचिरोली, आरमोरी, देसाईगंज, चामोर्शी इ. तालुक्यामध्ये वाहतूकीच्या साधनांचा विकास झालेला आहे. या तालुक्यातील अनेक गावे एकमेकांशी लहान–मोठया रस्त्यांनी ऐकमेकांशी जोडलेले आहेत पण इतर तालुक्यात फक्त महत्वाची गावे वगळता इतर लहान–लहान गाव, टोले हे एकमेकांशी रस्त्यानी जोडलेले नाहीत. त्याचा परिणाम लोकसंख्येच्या वितरणावर झालेला आहे.

**संदर्भ ग्रंथ** :

१. गडचिरोली जिल्हा जनगणना पुस्तिका, १९९१, २००१, २०११.
२. गडचिरोली जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन – २००९.
३. डॉ. विठ्ठल घारपुरे, लोकसंख्या भूगोल, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
४. डॉ. नागतोडे – लोकसंख्या भूगोल, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
५. डॉ. विठ्ठल घारपुरे, आर्थिक भूगोल, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
६. डॉ. विठ्ठल घारपुरे, मानवी भूगोल, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.